नि.दि.दा.क्र.२२७/२०१७
नि.क्र.३२

**<u>पुढील सरतपास वादींकरीता विधीज्ञ श्रीमती वर्मा यांच्या वतीने शपथेवर सुरु</u> -**

१. दि.१४/०९/२०१५ रोजी वादींनी माझ्या हक्कात या दाव्यासंबंधी नोटराईज्ड मुखत्यारपत्र लिहून दिले. त्या नोटराईज्ड मुखत्यारपत्र प्रत मी नि.क्र.३/१ वर दाखल केली आहे. आता मला त्या नोटराईज्ड मुखत्यारपत्र प्रत दाखविली असता त्यावर लिहून घेणार म्हणून माझी सही व अंगठा असून लिहून देणार म्हणून वादींची सही व अंगठे आहेत. त्यावर साक्षीदार म्हणून मनोज रणजीत श्रीगोंड व रमेश तुळशीराम वैष्णव यांच्या सहया व नोटरी श्री.वाय. के. शेख यांची सही व शिक्का आहे. त्यातील मजकुर मुळ नोटराईज्ड मुखत्यारपत्रा प्रमाणे खरा व बरोबर आहे. सदर नोटराईज्ड मुखत्यारपत्राची प्रत आता **<u>नि.क्र.३९</u>** वर आहे. (सदर दस्तास निशाणी क्रमांक देण्याकरीता प्रतिवादीच्या विधीज्ञांनी आक्षेप घेतलेला नाही त्यामुळे नोटराईज्ड मुखत्यारपत्राच्या प्रतला निशाणी क्रमांक देण्यात आले.)

**<u>उलटतपास प्रतिवादीकरीता विधीज्ञ श्री. चुडीवाल यांच्या वतीने शपथेवर सुरु</u> -**

२. माझी जन्मतारीख दि.०१/०६/१९५६ आहे. वादी क्र.२ सोबत माझे लग्न दि.०१/०५/१९८२ रोजी झाले. मी सन १९७८ पासून पुण्यात राहत आहे. बेलापूर गावाची मला संपूर्ण माहिती आहे असे सांगणे योग्य राहणार. बेलापूर ग्रामपंचायतच्या हद्दीमध्ये किती व कोणकोणत्या ठिकाणी स्मशानभूमी आहे, याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, बेलापूर ग्रामपंचायतच्या हद्दीमध्ये बेलापूर ग्रामपंचायतच्या अधिपत्याखाली चालणारी हिंदु समाजाकरीता एकच स्मशानभूमी आहे. हे म्हणणे खरे आहे की, दावा जमिनीलगत गट नं.२६९, २७० व ३४८ या जमिनी आहेत. हे म्हणणे खरे आहे की, बेलापूर ग्रामपंचायतच्या हद्दीमध्ये बेलापूर ग्रामपंचायतच्या अधिपत्याखाली चालणारी हिंदु समाजाकरीता स्मशानभूमी ही गट नं.३४८ मध्ये आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट नं.२६९ हा अमोलिक परिवाराच्या मालकीचा आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट नं.२७० हा तेलोरे परिवाराच्या मालकीचा आहे. हिंदु स्माशानभूमी, अमोलिक स्माशानभूमी व तेलोरे स्माशानभूमी या बाबत मला कोणतीही कागदोपत्री माहिती नाही. त्या संबंधीचे कागदपत्र मी दाखल करण्यास तयार आहे.

**<u>कागदपत्र दाखल करण्याकरीता पुढील उलटतपास तहकूब.</u>**

श्रवणोत्तर स्विकृत,

Digitally signed by ASHISH BIHARILAL MARLECHA
Date: 2025.10.31 17:01:02 +0530

(आशिष बि. मरलेचा)
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर
श्रीरामपुर, जि.अहमदनगर

दिनांक ३१/१०/२०२५